सकाळ

# महात्मा गांधींविषयक संदर्भग्रंथाचे शुक्रवारी प्रकाशन

कोल्हापूर, ता. २७ : व्हर्जिनिया (अमेरिका) येथील जेम्स मॅडिसन विद्यापीठातील दिवंगत प्रा. टेरी बेट्झल आणि शिवाजी विद्यापीठाच्या इंग्रजी अधिविभागातील प्रा. चंद्रकांत लंगरे यांनी महात्मा गांधी यांच्या जीवन व कार्याविषयी संपादित केलेल्या दोन आंतरराष्ट्रीय संदर्भग्रंथांचे प्रकाशन शुक्रवारी (ता. १) गांधी जयंतीच्या पूर्वसंध्येला ऑनलाईन होणार आहे. अमेरिकेतील प्रमाणवेळेनुसार सकाळी नऊला, तर भारतीय प्रमाणवेळेनुसार सायंकाळी साडेसहाला हा कार्यक्रम होईल. इंग्लंड पार्लमेंटमधील मजूर पक्षाचे सदस्य प्रा. लॉर्ड भिकू पारेख आणि गांधी यांचे पणतू तुषार गांधी उपस्थित असतील.

प्रा. बेट्झल आणि प्रा. लंगरे यांनी 'रिफ्लेक्शन्स ऑन महात्मा गांधी : द ग्लोबल परस्पेक्टिव्ह' आणि 'रिथिंकिंग महात्मा गांधी : द ग्लोबल अप्रायझल' संदर्भग्रंथ संपादित केले आहेत. महात्मा गांधी यांची १५० वी जयंती, अहिंसा दिनानिमित्त प्रकाशन समारंभ होईल.

प्रा. पारेख, श्री. गांधी यांच्यासह कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, जेम्स मॅडिसन विद्यापीठाचे प्रोव्होस्ट डॉ. हीथर कोल्टमन, मॅडिसन विद्यापीठाच्या कॉलेज ऑफ आर्टस् ॲण्ड लेटर्सचे अधिष्ठाता डॉ. रॉबर्ट ऑग्युरे, महात्मा गांधी सेंटरच्या संचालक डॉ. टैमी कासल उपस्थित राहतील. कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी https://linktr.ee/gandhicenterjmu या लिंकवर पूर्वनोंदणी आवश्यक आहे, असे डॉ. कासल यांनी कळविले आहे.



प्रा. लंगरे

### ६१ गांधी अभ्यासकांचे लेखन

दिवंगत प्रा. टेरी बेट्झल, प्रा. लंगरे यांनी 'इंडो-अमेरिकन बुक प्रोजेक्ट २०१९'अंतर्गत महात्मा गांधी यांच्याविषयीच्या ग्रंथांचा प्रकल्प हाती घेतला. त्यातून 'रिफ्लेक्शन्स ऑन महात्मा गांधी : द ग्लोबल परस्पेक्टिव्ह' आणि 'रिथिंकिंग महात्मा गांधी : द ग्लोबल अप्रायझल' हे दोन संदर्भग्रंथ साकार झाले आहेत.

2 8 SEP 2021
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ज्येष्ठांनी दिला स्वच्छतेचा संदेश

टेंबलाईवाडी, ता. २७ : शिवाजी विद्यापीठाच्या परिसरात प्रभात संचार मंचाच्या ज्येष्ठ नागरिकांनी स्वच्छता करून या वयातही स्वच्छतेच्या कामात सहभागी होऊन स्वच्छतेचा संदेश दिला. विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभाग, प्रभात संचार मंचातर्फे 'आझादी की ७५ वर्षे' या उपक्रमांतर्गत स्मृती उद्यान परिसरात स्वच्छता मोहिमेचे आयोजन करण्यात आले.



**उजळाईवाडी : प्रभात संचार मंचाच्या ज्येष्ठ नागरिकांतर्फे शिवाजी विद्यापीठ परिसरात स्वच्छता मोहीम राबविताना सदस्य.**

शासनाच्या 'आझादी की ७५ वर्षे' या उपक्रमाला ज्येष्ठांनी प्रतिसाद देऊन काल (ता. २६) सकाळी सात ते नऊ वेळेत स्वच्छता मोहिमेत सहभाग नोंदविला. शिवाजी विद्यापीठाच्या गेट नंबर आठच्या परिसरातील स्मृती उद्यान परिसर, परीक्षा विभागाकडे जाणाऱ्या रस्त्याच्या दुतर्फा सर्वांनी सहभाग घेतला. स्वच्छतेचे काम आनंदी वातावरणात सर्व ज्येष्ठ नागरिक करीत होते.

विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे प्रभारी संचालक प्रा. ए. एम. गुरव, अतुल एतावडेकर, आर. एम. जाधव, संतोष राठोड, प्रभात संचार मंचाचे श्रीकांत आडिवरेकर, डॉ. पुजारी यांच्यासह सर्व सदस्य उपस्थित होते. श्री. एतावडेकर यांनी आभार मानले.

तरूण भारत

# विद्यापीठातील स्मृती उद्यानात ज्येष्ठांकडून स्वच्छता

कोल्हापूर : येथील शिवाजी विद्यापीठातील आजीवन अध्ययन, विस्तार विभाग व प्रभात संचार मंच यांच्या सयुंक्त विद्यमाने 'आझादी की ७५ वर्ष" उपक्रमातंर्गत विद्यापीठातील स्मृती उद्यान परिसरात स्वच्छता मोहीम राबवली. या मोहिमेत ज्येष्ठ नागरिक सहभागी झाले होते. यावेळी आजीवन अध्ययन, विस्तार विभागाचे संचालक डॉ. ए. एम. गुरव, अतुल एतावडेकर, आर. एम. जाधव, संतोष राठोड, प्रभात संचार मंडळाचे श्रीकांत अडिवरेकर, डॉ. पुजारी आदी उपस्थित होते.

2 8 SEP 2021

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सर्क्युलर इकॉनॉमीसाठी मूलभूत प्रशासकीय बदल गरजेचे

## प्रा. अजय देशपांडे : शिवाजी विद्यापीठात कार्यक्रम

टेंबलाईवाडी, ता. २७ : "सर्क्युलर इकॉनॉमी आजची काळाची गरज आहे. ती रुजवायची असेल तर मूलभूत स्वरूपात प्रशासकीय बदल करणे आवश्यक आहे," असे मत आयआयटी-मुंबईच्या सेंटर फॉर पॉलिसी स्टडीजचे प्रा. अजय देशपांडे यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठाच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष तसेच इनोव्हेशन, इन्क्युबेशन सेंटरतर्फे आयोजित 'सर्क्युलर इकॉनॉमी फॉर रेझिलियन्स अ‍ॅण्ड सस्टेनेबलिटी' यावर कार्यक्रम झाला. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील अध्यक्षस्थानी होते.

प्रा. देशपांडे म्हणाले, "सर्क्युलर इकॉनॉमीसाठी कच्च्या मालाच्या साठवणुकीवर योग्य नियंत्रण, विश्वासार्हता तसेच डिजिटायझेशन करणे आवश्यक आहे. पर्यावरणाचा ऱ्हास करणाऱ्या कंपन्यांवर कठोर कारवाई अपेक्षित आहे. धोकादायक कचरा,



बायोमेडिकल कचरा यासंदर्भात वापरलेल्या वस्तूंचे पुनरुज्जीवन करून सेवा देणाऱ्या कंपन्यांची गरज आहे."

पुणे येथील पल फॅशन्स तसेच सी.आय.आय. पश्चिम विभागाचे अध्यक्ष चरणसिंग अहुजा म्हणाले, "औद्योगिक जगतात कच्च्या मालावर प्रक्रिया करताना काही गोष्टींचा विचार व्हावा. विशेषतः वस्त्रोद्योग क्षेत्रात रिसायकल, रियूज आणि रिड्यूस त्रिसूत्रीचा अंमल व्हावा." पुण्यातील बायफ फाउंडेशनचे अध्यक्ष जी. जी. सोहनी म्हणाले, की सर्क्युलर इकॉनॉमीचा ग्रामीण भागाच्या विकासासाठी मोठा हातभार लागू शकतो. आयसीटीचा वापर करून गटशेतीचे प्रयोग येत्या काळात वाढविणे आवश्यक आहे. यातून ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना मिळेल.

प्र-कुलगुरू डॉ. पाटील म्हणाले, की सर्क्युलर इकॉनॉमी यशस्वी करायची असेल तर पारंपरिक अर्थव्यवस्थेकडून सर्क्युलर इकॉनॉमीकडे वळावे लागेल. यासाठी शास्त्रीय मार्गांचा अवलंब व्हावा. पारंपरिक ऊर्जास्रोतांचा उपयोग न करता ऊर्जा क्षेत्रात नवनवे पर्याय शोधावे लागतील.

विद्यापीठाच्या गुणवत्ता हमी कक्षाचे संचालक प्रा. डॉ. एम. एस. देशमुख यांनी प्रास्ताविक केले. 'वायसीएसआरडी'चे सहायक संचालक डॉ. नितीन माळी यांनी आभार मानले.

पुण्यनगरी

# सर्क्युलर इकॉनॉमीसाठी मूलभूत प्रशासकीय बदल हवेत : देशपांडे

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

सर्क्युलर इकॉनॉमी आजच्या काळाची गरज आहे. ती रुजवायची असेल तर मूलभूत स्वरूपात प्रशासकीय बदल करणे आवश्यक आहे, असे मत आयआयटी मुंबईच्या सेंटर फॉर पॉलिसी स्टडीजचे प्रा. अजय देशपांडे यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठाच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष तसेच इनोव्हेशन, इन्क्युबेशन सेंटरच्या वतीने आयोजित 'सर्क्युलर इकॉनॉमी फॉर रेझिलियन्स अ‍ॅण्ड सस्टेनेबलिटी' या विषयावर बोलत होते. अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील होते. विद्यापीठाच्या गुणवत्ता हमी कक्षाचे संचालक प्रा. डॉ. एम. एस. देशमुख यांनी प्रास्ताविक केले. वायसीएसआरडीचे सहायक संचालक डॉ. नितीन माळी यांनी आभार मानले.

प्रा. देशपांडे म्हणाले, सर्क्युलर इकॉनॉमीसाठी कच्च्या मालाच्या साठवणुकीवर योग्य नियंत्रण, विश्वासार्हता तसेच डिजिटलायझेशन करणे आवश्यक आहे. पर्यावरणाचा ऱ्हास करणाऱ्या कंपन्यांवर कठोर कारवाई अपेक्षित आहे. धोकादायक कचरा, बायोमेडिकल कचरा यासंदर्भात वापरलेल्या वस्तूंचे पुनरुज्जीवन करून सेवा देणाऱ्या कंपन्यांची गरज आहे. पुणे येथील पल फॅशन्स तसेच सी.आय.आय पश्चिम विभागाचे अध्यक्ष चरणसिंग अहुजा म्हणाले, औद्योगिक जगतात कच्च्या मालावर प्रक्रिया करताना काही गोष्टींचा विचार व्हावा. विशेषतः वस्त्रोद्योग क्षेत्रात रिसायकल, रियूज आणि रिड्यूस या त्रिसूत्रीचा अंमल व्हावा. पुण्यातील बायफ फाऊंडेशनचे अध्यक्ष जी. जी. सोहनी म्हणाले, सर्क्युलर इकॉनॉमीचा ग्रामीण भागाच्या विकासासाठी मोठा हातभार लागू शकतो. आयसीटीचा वापर करून गटशेतीचे प्रयोग येत्या काळात वाढवणे आवश्यक आहे. यातून ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना मिळेल.

28 SEP 2021

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सर्क्युलर इकॉनॉमीसाठी मूलभूत प्रशासकीय बदल हवेत : प्रा. देशपांडे

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

सर्क्युलर इकॉनॉमी आजच्या काळाची गरज आहे. ती रुजवायची असेल तर मूलभूत स्वरूपात प्रशासकीय बदल करणे आवश्यक आहे, असे मत आयआयटी मुंबईच्या सेंटर फॉर पॉलिसी स्टडीजचे प्रा. अजय देशपांडे यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठांतर्गत गुणवत्ता हमी कक्ष, इनोव्हेशन, इन्क्युबेशन सेंटरच्या वतीने आयोजित 'सर्क्युलर इकॉनॉमी फॉर रेझिलियन्स अँड सस्टेनेबिलिटी' या विषयावरते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील होते. प्रा. देशपांडे म्हणाले, सर्क्युलर इकॉनॉमीसाठी कच्च्या मालाच्या साठवणुकीवर योग्य नियंत्रण, विश्वासार्हता व डिजिटलायझेशन करणे आवश्यक आहे. पर्यावरणाचा ऱ्हास करणाऱ्या कंपन्यांवर कठोर कारवाई अपेक्षित आहे. धोकादायक कचरा, बायोमेडिकल कचरा यासंदर्भात वापरलेल्या वस्तूंचे पुनरुज्जीवन करून सेवा देणाऱ्या कंपन्यांची गरज आहे.

सीआयआय पश्चिम विभागाचे अध्यक्ष चरणसिंग अहुजा म्हणाले, औद्योगिक जगतात कच्च्या मालावर प्रक्रिया करताना काही गोष्टींचा विचार व्हावा. विशेषतः वस्त्रोद्योग क्षेत्रात रिसायकल, रियूज आणि रिड्यूस या त्रिसूत्रीचा अंमल व्हावा. पुण्यातील बायफ फाऊंडेशनचे अध्यक्ष जी. जी. सोहनी म्हणाले, सर्क्युलर इकॉनॉमीचा ग्रामीण भागाच्या विकासासाठी मोठा हातभार लागू शकतो. आयसीटीचा वापर करून गटशेतीचे प्रयोग येत्या



शिवाजी विद्यापीठातून...

काळात वाढविणे आवश्यक आहे. यातून ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना मिळेल.

प्र-कुलगुरू डॉ. पाटील म्हणाले, सर्क्युलर इकॉनॉमी यशस्वी करायची असेल तर पारंपरिक अर्थव्यवस्थेकडून सर्क्युलर इकॉनॉमीकडे वळावे लागेल. यासाठी शास्त्रीय मार्गांचा अवलंब व्हावा. पारंपरिक ऊर्जास्त्रोतांचा उपयोग न करता ऊर्जा क्षेत्रात नवनवे पर्याय शोधावे लागतील. विद्यापीठाच्या गुणवत्ता हमी कक्षाचे संचालक प्रा. डॉ. एम. एस. देशमुख यांनी प्रास्ताविक केले. वायसीएसआरडीचे सहायक संचालक डॉ. नितीन माळी यांनी आभार मानले.

तरुण भारत

# 'सक्र्युलर इकॉनॉमीसाठी मूलभूत बदल हवेत'

■ प्रा. देशपांडे यांचे मत

प्रतिनिधी

कोल्हापूर

सर्क्युलर इकॉनॉमी रूजवण्यासाठी मुलभूत स्वरूपात प्रशासकीय बदलाची आवश्यकता आहे, असे प्रतिपादन आयआयटी मुंबईच्या सेंटर फॉर पॉलिसी स्टडीजचे प्रा. अजय देशपांडे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठांतर्गत गुणवत्ता हमी कक्ष, इनोव्हेशन, इन्क्युबेशन सेंटरच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कार्यक्रमात ते 'सर्क्युलर इकॉनॉमी फॉर रेझिलियन्स अॅन्ड सस्टेनेबिलिटी" यावर ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्र–कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील होते.

प्रा. देशपांडे यांनी सर्क्युलर इकॉनॉमीसाठी कच्च्या माला साठवणुकीवर योग्य नियंत्रण, डिजिटलायझेशनची गरज असल्याचे सांगितले. पुणे येथील सी.आय. आय पश्चिम विभागाचे अध्यक्ष चरणसिंग अहुजा यांनी कच्च्या मालावर प्रक्रिया करताना काही गोष्टींचा विचार व्हावा. वस्त्रोद्योग क्षेत्रात रिसायकल, रियूज आणि रिड्यूस या त्रिसूत्रीचा अंमल व्हावा, असे सांगितले. पुण्यातील बायफ फाऊंडेशनचे अध्यक्ष जी. जी. सोहनी यांनी सर्क्युलर इकॉनॉमीचा ग्रामीण विकासासाठी मोठा हातभार लागेल, असा विश्वास व्यक्त केला. प्र–कुलगुरू डॉ. पाटील यांनी सर्क्युलर इकॉनॉमी यशस्वी करण्यासाठी पारंपरिक अर्थव्यवस्थेत बदल अपेक्षित असल्याचे सांगितले. डॉ. एम. एस. देशमुख यांनी प्रास्ताविक केले. डॉ. नितीन माळी यांनी आभार मानले.

सकाळ

# तुषार गांधी यांचे शनिवारी ऑनलाईन व्याख्यान



तुषार गांधी

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातर्फे २ ऑक्टोबरला महात्मा गांधी यांची जयंती आणि आंतरराष्ट्रीय अहिंसा दिनानिमित्त महात्मा गांधी यांचे पणतू, विचारवंत तुषार गांधी यांचे विशेष ऑनलाईन व्याख्यान होत आहे. 'भारतीय स्वातंत्र्याची पंचाहत्तरी आणि महात्मा गांधी' यावर श्री. गांधी संवाद साधतील. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी असतील; तर प्र-कुलगुरू डॉ. पी.एस. पाटील, कुलसचिव डॉ. विलास नांदिवडेकर प्रमुख उपस्थित असतील. शनिवारी (ता. २) सकाळी राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्या जयंतीच्या निमित्ताने सकाळी साडेदहाला विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय भवनात कुलगुरू डॉ. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पाटील यांच्या हस्ते राष्ट्रपुरुषांच्या प्रतिमांना अभिवादनाचा कार्यक्रम होईल. त्यानंतर अकराला विद्यापीठाच्या 'शिव-वार्ता' (https://www.youtube.com/c/ShivVarta) या वाहिनीवरून श्री. गांधी यांचे व्याख्यान प्रसारित करण्यात येईल. सर्व शिक्षक, विद्यार्थी, नागरिकांनी व्याख्यानाचा लाभ घ्यावा, असे आवाहन गांधी अभ्यास केंद्राच्या समन्वयक डॉ. भारती पाटील यांनी केले आहे.

पुढारी

# तुषार गांधी यांचे २ ऑक्टोबरला विशेष ऑनलाईन व्याख्यान

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

शिवाजी विद्यापीठातर्फे २ ऑक्टोबर रोजी महात्मा गांधी यांची जयंती व आंतरराष्ट्रीय अहिंसा दिन यांचे औचित्य साधून महात्मा गांधी यांचे पणतू, ज्येष्ठ विचारवंत व सामाजिक कार्यकर्ते तुषार गांधी यांचे विशेष ऑनलाईन व्याख्यान आयोजित केले आहे.

'भारतीय स्वातंत्र्याची पंच्याहत्तरी आणि महात्मा गांधी' या विषयावर ते संवाद साधतील. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के असतील. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. शनिवारी (दि.२) सकाळी राष्ट्रपिता महात्मा गांधी व माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्या जयंतीच्या निमित्ताने सकाळी १०.३० वाजता विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय भवनात कुलगुरू डॉ. शिर्के व प्र-कुलगुरू डॉ. पाटील यांच्या हस्ते राष्ट्रपुरुषांच्या प्रतिमांना अभिवादनाचा कार्यक्रम होईल. त्यानंतर ११ वाजता विद्यापीठाच्या 'शिव-वार्ता' (https://www.youtube.com/c/ShivVarta) या वाहिनीवरून हे व्याख्यान प्रसारित करण्यात येईल. सर्व शिक्षक, विद्यार्थी व नागरिकांनी व्याख्यानाचा लाभ घ्यावा, असे आवाहन गांधी अभ्यास केंद्राच्या समन्वयक डॉ. भारती पाटील यांनी केले आहे.

2 8 SEP 2021

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पर्यटनाचा विकास महत्त्वाचा : डॉ. पोतदार

टेंबलाईवाडी, ता. २७ : 'सर्वसमावेशक विकास करण्याच्या दृष्टिकोनातून पर्यटनाचा विकास महत्त्वाचा आहे,'' असे भूगोल अधिविभागप्रमुख डॉ. मीना पोतदार यांनी सांगितले. शिवाजी विद्यापीठातील आजीवन अध्ययन व विस्तार विभाग, निरंतर शिक्षणाच्या माध्यमातून 'ट्रॅव्हल अ‍ॅण्ड टुरिझम' अभ्यासक्रम केंद्रातर्फे जागतिक पर्यटन दिनानिमित्त 'पर्यटन सर्वसमावेशक विकास' यावर व्याख्यान झाले.

डॉ. पोतदार यांनी पर्यटनविषयक संकल्पना, पर्यटनाचे महत्त्व, पर्यटनाच्या माध्यमातून ऐतिहासिक, सांस्कृतिक, पर्यावरणीय व सौंदर्य प्रवास वर्णन या माध्यमातून पर्यटन कसे महत्त्वाचे आहे, हे स्पष्ट केले. पर्यटन केंद्राच्या सर्वसमावेशक विकासाचा दृष्टिकोन डोळ्यांसमोर ठेवून मानसिक, भावनिक, शारीरिक आरोग्य कसे साधता येईल, हे सांगितले.

शहाजी महाविद्यालयाचे डॉ. काशीद-पाटील, वाई येथील किसन वीर महाविद्यालयाचे डॉ. भीमाशंकर बिराजदार, ऐतवडे खुर्द येथील वारणा महाविद्यालयाचे डॉ. सुरेश इंगळे, गडहिंग्लज येथील 'ज्ञानप्रबोधन'च्या डॉ. रेखा पोतदार यांनी मनोगत व्यक्त केले. प्रा. पी. आर. माळी यांचे सहकार्य लाभले. प्राचार्य डी. के. पाटील उपस्थित होते. आजीवन अध्ययन व विस्तार अधिविभागाचे प्र. संचालक डॉ. ए. एम. गुरव यांनी 'ट्रॅव्हल अ‍ॅण्ड टुरिझम' अभ्यासक्रमात करिअर करणे कसे उपयुक्त आहे, त्याची व्याप्ती, निरंतर अभ्यासक्रमांसंदर्भात माहिती दिली. डॉ. सुमन बुवा यांनी स्वागत केले. यशोधन बोकिल यांनी आभार मानले.

पुढारी

# सर्वसमावेशक विकासासाठी पर्यटन महत्त्वाचे : प्रा. पोतदार

## विद्यापीठात जागतिक पर्यटन दिनानिमित्त व्याख्यान

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शाश्वत, सर्वसमावेशक विकास करण्यांच्या दृष्टिकोनातून पर्यटनाचा विकास महत्त्वाचा आहे, असे प्रतिपादन भूगोल अधिविभागातील प्रा. डॉ. मीना पोतदार यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील आजीवन अध्ययन व विस्तार विभाग, निरंतर शिक्षणाच्या माध्यमातून ट्रॅव्हल अँड टुरिझम अभ्यासक्रमाचे केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक पर्यटन दिनानिमित्त 'पर्यटन सर्वसमावेशक विकास' या विषयावर त्या बोलत होत्या.

डॉ. पोतदार म्हणाल्या, पर्यटनविषयक संकल्पना, पर्यटनाचे महत्त्व, पर्यटनाच्या माध्यमातून ऐतिहासिक, सांस्कृतिक पर्यावरणीय, सौंदर्य प्रवास वर्णन या माध्यमातून पर्यटन महत्त्वाचे आहे. पर्यटन केंद्राच्या सर्वसमावेशक विकासाचा दृष्टिकोन डोळ्यासमोर ठेवून मानसिक भावनिक, शारीरिक आरोग्य साधणे महत्त्वाचे आहे. शहाजी कॉलेजचे डॉ. काशीद पाटील, किसन वीर महाविद्यालय वाईचे डॉ. भीमाशंकर बिराजदार, वारणा महाविद्यालय ऐतवडे-खुर्दचे डॉ. सुरेश इंगळे, ज्ञानप्रबोधन, गडहिंग्लजच्या डॉ. रेखा पोतदार यांनी मनोगत व्यक्त केले.

आजीवन अध्ययन व विस्तार अधिविभागाचे प्र. संचालक डॉ. ए. एम. गुरव यांनी अध्यक्षीय समारोप केला. पाहुण्यांची ओळख डॉ. सुमन बुवा यांनी करून दिली. यशोधन बोकील यांनी आभार मानले. यावेळी प्राचार्य डी. के. पाटील, प्रा. पी. आर. माळी आदी उपस्थित होते.

पुढारी

# विद्यापीठाच्या बृहत् आराखड्यासाठी प्रस्ताव सादर करण्याची गुरुवारपर्यंत मुदत

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाने पंचवार्षिक बृहत् आराखडा व त्यास अनुसरून शैक्षणिक वर्ष २०२२-२३ च्या विविध शैक्षणिक प्रस्तावासाठीची वार्षिक योजना संकेतस्थळावर ठेवली आहे. त्यानुसार ३० सप्टेंबरपर्यंत शैक्षणिक संस्था, संलग्न महाविद्यालये, मान्यताप्राप्त संस्थांना प्रस्ताव सादर करता येणार आहेत. शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून राज्य शासनाच्या मान्यतेच्या अंतरावर नवीन महाविद्यालये, नवीन विद्याशाखा, विषय, अभ्यास पाठ्यक्रम, अतिरिक्त तुकड्या, प्रवेशक्षमता वाढ, एम.फिल., पीएच.डी. प्रयोगशाळा मान्यता, संशोधन केंद्र व संशोधन संस्था सुरू करण्यासंदर्भातील प्रस्ताव, महाविद्यालयाच्या नावातील बदलाबाबत विद्यापीठाच्या www.unishivaji.ac.in या संकेतस्थळावरील लिंकवर जाहिरात देण्यात आली आहे. प्रथम शुल्क बँकेत जमा करून प्रस्ताव ३० तारखेनंतर सादर करता येणार नाही. शुल्क व प्रस्ताव एकत्र व एकाचवेळी कार्यालयास सादर करणे आवश्यक आहे.

पुढारी

# विद्यापीठ ऑनलाईन परीक्षेला २३२ विद्यार्थी

कोल्हापूर : विद्यापीठाच्या उन्हाळी सत्रातील मार्च-एप्रिलच्या परीक्षांतर्गत सोमवारी बी.ए.,बी. कॉम., एम.ए.,एम.कॉम. अभ्यासक्रमाच्या परीक्षा सुरळीतपणे झाल्या. विद्यापीठ कार्यक्षेत्रातून ३६३ पैकी २३२ विद्यार्थ्यांनी ऑनलाईन परीक्षा दिली. दरम्यान, विद्यापीठाच्या वतीने विविध अभ्यासक्रमांच्या परीक्षांचे निकाल जाहीर करण्यात आले आहेत.